**नि.फौ.ख.क्र.१६६/२०२४**
आर.पी.एफ. घोरपडी -वि.- संदीप बांगर
**निशाणी क्र.१ च्या पुढे**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – अशोक कुमार धनकड (फिर्यादी)
वय – ५६ वर्षे, व्यवसाय – सहा.उपनिरीक्षक, रेसुब जेजुरी
रा.- जेजुरी, जि. पुणे.

**<u>दोषारोपापुर्वी सरतपासणी सरकारी अभियोक्ता श्री.डी.बी. त्रीपाठी यांचेमार्फत शपथेवर सुरु-</u>**

दि. २१/०५/२०२४ रोजी मी रेसुब जेजुरी येथे सहा.उपनिरीक्षक या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी सायबर सेल पुणे यांचेकडुन एक मोबाईल क्रमांक मिळाला होता ज्यावरुन एक इसम पर्सलन युजर आय.डी बनवुन रेल्वे ई-तिकीटांचा अवैध व्यवसाय करत होता. आम्ही त्या माहितीवरुन फोनव्दारे संपर्क केला तेव्हा कळाले की, मोनिका हॉटेल, जेजुरी येथे तो इसम आहे, परंतु त्यादिवशी आम्हाला तो मिळुन आला नाही. आम्ही तेथे चौकशी केली असता असे कळाले की, संदीप किराणा स्टोअर्स च्या मागे तो मुलाणी यांच्या घरात भाडयाने राहतो.

२. आम्ही टीमसह तेथे गेलो. तेथे आरोपी व त्याचे मालक आम्हाला मिळाले. आम्ही त्यांना आमचा परीचय दिला व येण्याचे कारण सांगितले. त्यावेळी आरोपीने त्याचे नाव संदीप बांगर असे सांगितले. त्यावेळी त्याने पर्सनल युजर आय.डीवरुन तिकीट काढत असल्याचे कबुल केले. प्रत्येक तिकीटामागे १००/- रुपये जास्त घेत असल्याचे त्याने सांगितले. त्यानुसार मी आरोपीविरुध्द तक्रार दिली. आता मला तक्रार दाखवण्यात आली. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. १२** देण्यात येतो. त्यानंतर मी आरोपी व माझी तक्रार चौकशी अधिकारी डी.के. पटेल यांना सोपवले. मी आरोपीस ओळखतो. तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>साक्षीदाराचा उलटतपास दोषारोपापर्यंत तहकुब करण्यात आला.</u>**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

(एन.जे.चव्हाण)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. २४/११/२०२५

**नि.फौ.ख.क्र.१६६/२०२४**
आर.पी.एफ. घोरपडी -वि.- संदीप बांगर
**निशाणी क्र.१ च्या पुढे**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – अशोक कुमार धनकड (फिर्यादी)
वय – ५६ वर्षे, व्यवसाय – सहा.उपनिरीक्षक, रेसुब जेजुरी
रा.- जेजुरी, जि. पुणे.

**<u>दोषारोपानंतर आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ श्री. ए.टी.नावडकर यांचेमार्फत सुरू-</u>**

३. मी स्वतः घटनास्थळी गेलो होतो. माझे समक्ष आरोपीने कोणत्याही ग्राहकाकडुन पैसे घेतले नाही. आमचेकडे घटनास्थळी जाण्याकरीता लेखी आदेश नव्हता. माझे समक्ष आरोपीकडुन तिकीटे व पर्सनल युजर आय.डी मिळाला नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2025.11.24 17:04:24 +0530

(एन.जे.चव्हाण)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. २४/११/२०२५